**सत्यापन**

फौ. किरकोळ अर्ज क्र.६८१/२०२५

**फिर्यादीचे शपथेवर बयान**

शपथेवर कथन करतो की,

**माझे नाव – नितीन महादेव पालखे,**

वय–४८ वर्षे, व्यवसाय–शेती,

राहणार–इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

इंदापूर येथील नगरपालिका नं.८, सिटी सर्व्हे नं.३७५६ ही मिळकत माझ्या आईचे वडील नारायण यांची मिळकत आहे. सदर मिळकतीत माझी आई, मी, माझा भाऊ व मावशी, मावशीचा मुलगा असे एकत्र राहतात. सागर शेंदूरकर हा माझा मावसभाऊ आहे व शकुंतला ही माझी मावशी आहे. दि.२१/०७/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता मी सागर शेंदूरकर व शकुंतला शेंदूरकर यांना राहत्या घरी बांधकाम करू नका, यायजायचा रस्ता बंद होईल असे म्हणालो. त्यावर *त्यांनी मला इथे राहायचे नाही असे म्हणून शिवीगाळ केली व शेती करतो तिथे रहा असे म्हणाले.* मी पोलीस स्टेशनला गेलो. पोलीसांनी एन.सी. घेतली परंतू कारवाई केली नाही. दुस–या दिवशी २२ तारखेला १२.०० वाजता शटर बसविण्याचे काम चालू होते. त्यावेळी मी त्यांना अडविले. त्यावेळी आरोपींनी मला फायटरने, लाथाबुक्यांनी मारहाण केली. शेजारच्या लोकांनी सोडवासोडव केली. माझे कपडे रक्ताने भरलेले होते. पोलीसांनी मला उपजिल्हा रूग्णालयात उपचार करण्यासाठी पाठविले. पोलीसांनी दुस–या दिवशी माझी तक्रार घेतली नाही. केवळ एन.सी.नोंदवून घेतली. दि.१६/०८/२०२५ रोजी माझी पत्नी शितल हिला आरोपी याने शिवीगाळ करून मारहाण केली तसेच माझ्या पत्नीला घरामध्ये कोंडून ठेवले. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला तक्रार केली परंतू पोलीसांनी एन. सी. नोंदवून घेतली व कारवाई केली नाही. पोलीसांनी मला कोर्टात जाण्यास सांगितले.

N.M. Palkhe.

------------

फिर्यादीची सही/ अंगठा

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

Patil 28/10/25

**दिनांक –२८/१०/२०२५**

**(ए. बी. पाटील)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

इंदापूर.